# IN TROUBLED WATERS

By Deepak Lokhande

A PROPOSED marine sanctuary at Malwan in Sindhudurg is running into choppy waters with the local fisherfolk up in arms against the project.

Despite an assurance from the state Fisheries Minister Narayan Rane, who was at Malwan recently for a fishermen's rally, that the government was not proposing to set up any marine project in the near future, local fishermen were worried. They point out that the state forest department has recently put up signboards indicating the boundaries of the sanctuary and created posts specifically for the project.

In 1983, a Japanese company was awarded the project, earlier known as the marine park project. Malwan was selected because of its bio-diversity and pollution-free waters. In 1987, the state Government issued a Government Resolution (GR) directing its forest department to co-operate with project officials as and when they were appointed. The forest department was also directed to create certain posts for those who would be involved with the project. Despite the directives, there was no more activity on the project either on the state Government's part or on the part of the Japanese company.

In 1991, however, a survey was conducted by the forest department, stirring up the controversy once again.

The local fishermen and traders are worried because no fishing will be allowed near Malwan if the sanctuary comes up, thus ruining a business of about Rs 70 crore annually.

Says Krishna Tamhankar, a local leader of the traders, "On one hand the government wants to encourage fishing and has provided soft loans to fishermen to purchase powerful boats, advanced machinery. On the other, it wants to ruin what was once one of the most flourishing natural ports."

The worst affected will be societies of *raapandars* (fisherfolk who are involved in shore fishing). There are about 135 societies of *raapandars,* each consisting of 30 to 40 individuals who are entirely dependent on the two-month fishing season when fish swarm near the shore in large numbers.

"A *raapandar* will know by the colour changes in the water surface that the fish are there. He then pulls in his huge nets known as *raapans* which will have tonnes of fish trapped in it. It requires great skill and the *raapandar* has to be near the shore round the clock. If they are resettled due to the project, they would be left with absolutely no work," says Tamhankar.

Fishermen, involved in deep sea and boat fishing, will also be affected because the project will impose restrictions on them like no spillage of diesel, kerosene or other pollutants.

Former deputy chairman of the local panchayat samiti Ramesh Todankar said, "There are about 300 to 350 fishing boats owned by locals. Almost everybody in Malwan is connected with fishing. Mangoes and cashews serve only as secondary sources of income to most locals.





*The idyllic landscape of Malwan which the fishermen (right) fear will be destroyed*

**Malwan fishermen up in arms against proposed marine sanctuary**

Once the project comes up, the fishermen will be shifted to Sarjekot, the nearest port, which is not in service now and is very dangerous due to the rocks around the shore."

Dnyanesh Cheulkar, veteran socialist leader who enjoys a demi-God status among the local fisherfolk, was the first to blow the whistle on the project in the early '90s.

"I came to know about the project when the some forest officials came to survey the area. I sought a meeting with the officials but they were also not very clear about the project. But I gathered that the park would mean disaster for the local fishermen," Cheulkar said.

The locals are also upset that the district has been declared a tourism district and fear that its beauty will be lost if it is invaded by the culture of five-star tourists.

State revenue minister Narayan Rane, who is the guardian minister of the Sindhudurg district and represents it in the state Legislative Assembly, says the project is dead. "There is no follow-up from the company and it appears to have vanished in thin air. The posts that were recently created for the park are according to the notification in 1987. However, I held a meeting with the secretary concerned and instructed him to abolish the posts as no formal proposal was lying with the project," he said.

When told that the fishermen had not been given any information about the project, Rane said that even his government did not have any information.

"We do not have any detailed report as to who will execute the project, what will be its cost and other details," he said.

He promised to stand by the fishermen. "Mind you, I will not support them merely because they are from my constituency. I will support them since the project, as of now, has no arrangements for their resettlement," he said.

# मालवण तालुका श्रमिक मच्छिमार संघ

धुरीवाडा – मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६०६
रजि. नं. महाराष्ट्र/२९७/सिंधुदुर्ग २५ मार्च १९८७
रजि. नं. एफ्/४५५/सिंधुदुर्गद २४/२/१९८८

वर्ष १४ वे

# वार्षिक अहवाल

१९९९ - 2000

कार्यकारी मंडळ १९९८ - २००१

श्री. रमेश रा. धुरी –धुरीवाडा
अध्यक्ष

श्री. जॉन घाब्रियल नरोन्ना–मेढा
उपाध्यक्ष

श्री. रमेश गोविंद कुबल – दांडी
कार्यवाह

श्री. मेघनाथ गणपत धुरी – दांडी
सहकार्यवाह

श्री. ज्ञानेश्वर जनार्दन मालंडकर – दांडी
कोषाध्यक्ष

### सभासद

श्री. तुकाराम अंकुश मायबा – तळाशिल
श्रीमती सुमति शिवराम सादये – दांडी आवार
श्री. शरद विष्णू ढोके – वायरी भूतनाथ
सौ. सरोज विठोबा बटा – तारकर्ली
श्री. द्वारकानाथ यशवंत तोडणकर – वायरी
श्री. कृष्णनाथ भगवान तांडेल – मिर्याबांदा
श्री. ल्कामेथ बेजमी डिसोजा – दांडी
श्री. अरविंद तुकाराम हुले – दांडी
श्री. आनंद जनार्दन मालंडकर – देवबाग
श्री. बब्रुवाहन अर्जुन राऊळ – देवबाग

## वार्षिक अहवाल १९९९ – २०००

सभासद बंधुभगिनिनो,

३१ मार्च २००० रोजी पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षाचा संक्षिप्त अहवाल सादर करण्यास आनंद होत आहे.

१) यावर्षी कार्यकारणीच्या एकूण सहा सभा आणि सर्वसाधारण सभा एक अशा एकूण सात सभा संपन्न झाल्या.

२) संघाने मत्स्यदुष्काळ जाहिर करण्याची मागणी केली. सिंधुदुर्ग जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालयाने मागणीला दुजोरा दिला. पण शासनाने मागणी मान्य केली नाही.

३) दांडी आवारातील महिलांच्या सागरकन्या मच्छिमार सोसायटीला चालना दिली. आवारात प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना नाममात्र भाडयाने गाळे/कावने देण्याची विनंती केली.

४) मासेमारी अधिनियमाचे पालन करण्यासाठी जिल्हा सल्लागार मच्छिमार संघाच्या सभेत सातत्याने मागणी केली. गोव्यातील पर्सिनेटच्या नौकांच्या बेकायदा मासेमारीचा प्रश्न शासनाच्या नजरेस आणून दिला. कडक कारवाईची मागणी केली १ मे १९९९ रोजी मच्छिमारांच्या विविध मागण्यांसाठी मालवण तहसीलदार कार्यालयावर धरणे. आश्वासने मिळाली पण कार्यवाही नाही.

५) विजयदुर्ग खाडीतील बेकायदा मच्छिमारी बंद पाडण्यासाठी मत्स्यव्यवसाय कार्यालय आणि सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केली. विजयदुर्ग खाडी परिसरातील मच्छिमारांचा मेळावा आयोजित करून रामभाऊ पाटील, मुंबई, संघाचे संस्थापक ज्ञानेश देऊलकर व अध्यक्ष रमेश धुरी यांनी मार्गदर्शन केले.

६) तांबळडेग, मुणगे, आडबंदर किनाऱ्यावर बेकायदा मच्छिमारी करणाऱ्या ट्रॉलर्स विरोधी कार्यालयाला निवेदने सादर केली. विभागीय उपआयुक्तांची मुंबईस जाऊन भेट घेतली.

७) मच्छिमारांच्या प्रश्नासंबंधी जिल्हाधिकारी, कस्टम अधिकारी आणि सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांचेशी विविध प्रश्नावर चर्चा केली.

८) कारगीलमध्ये धारातिर्थी पडलेल्याना मदतनिधी जमा करण्यास संघाचे कार्यकर्ते सामील झाले होते.

९) शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या कु. भाग्यश्री खराडे, देवबाग कु. दिप्ती प्रभू दांडी, कु. डॉली फर्नांडीस, देवबाग यांना परितोषिके देऊन गौरवण्यात आले.

१०) कोकण विकास कार्यशाळेमध्ये अध्यक्ष रमेश धुरी सामील. दाभोळ खाडीतील प्रश्नाला वाचा फोडली. तसेच चिलका बचाव आंदोलन, ओरीसा येथील पदयात्रेत सामील.

११) गोरेगाव येथील समन्वय व्यासपीठाच्या कार्यशाळेत संघाचा सहभाग.

१२) मच्छिमारांच्या वतीने नगररचनाकार ओरोस यांचेकडे दि. २२/९/१९९९ रोजी मालवण येथील संकल्पित सागरी अभयारण्या विषयीच्या हरकतीचे निवेदन सादर केले.

१३) महिला बालविकास अधिकारी, ओरोस यांच्याकडे दुर्बल घटकातील पंचवीस महिलांचे अनुदानासाठी अर्ज सादर केले.

१४) नॅशनल फिश वर्कर्स फोरमच्या डिसेंबर ९९ च्या आंध्रप्रदेशात संपन्न झालेल्या कार्यशाळेत श्री. रमेश धुरी, श्री. प्रताप खराडे आणि क्लामेत डिसोजा सामील झाले. त्यानी मच्छिमारांचे प्रश्न मांडले.

सागरातील मत्स्योत्पादन दिवसें दिवस कमी होत चालले आहे. या संबंधी विविध स्तरावर माहिती मिळवून भारतसरकारने आणि महाराष्ट्र शासनाने मत्स्य व्यवसाय धोरणाचा फेरविचार करावा. अशा आशयाचे निवेदन संघाचे संस्थापक श्री. ज्ञानेश देऊलकर यांनी दि. ९ ऑगस्ट १९९९ रोजी सादर केले असून पारंपारिक मच्छिमारांना संरक्षण देण्याची मागणी केलेली आहे. या मागणीस पर्सिननेटवर बंदी, अतिरेकी मच्छिमारीचा प्रश्न, सागरी मासेमारी, अधिनियमाचे उल्लंघन, पावसाळ्यातील यंत्रनौकांची मासेमारी आणि सागरातील प्रदुषण हे विषय मांडलेले असून मच्छिमारांनी या मागणीचा पाठपुरावा करावा. अन्यथा पारंपारिक मच्छिमारांच्या हातून हा व्यवसाय जाऊन सागरावर धनिकांची मक्तेदारी होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. मच्छिमारांनी वेळीच सावध होऊन मत्स्यव्यवसायावर होणारे हे अतिक्रमण एक जुटीच्या जोरावर परतवून लावले पाहिजे अशी आग्रहाची विनंती करीत आहोत.

## ऋणनिर्देश

संघाला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. मत्स्यव्यवसाय संचालक कार्यालय, कस्टम आणि बंदर अधिकारी मालवण, सिंधुदुर्ग मच्छिमारी सह. सोसा., सर्जेकोट पंचक्रोशी मत्स्यव्यवसाय सह. सोसा. लि., रामेश्वर मच्छिमारी सह. सोसा., वाघेश्वर मच्छिमार सह. सोसा., मालवण मच्छिमार सह. सोसा., राजकोट मच्छिमार सह. सोसा., श्री. श्रीकृष्ण ताम्हणकर, श्री. रूजाय पिंटो, श्री. चंद्रकांत तारी, दैनिक तरूण भारत, दै. सकाळ, दै. रत्नागिरी टाईम्स, साप्ताहिक जनयुग, साप्ता. कोकणशक्ति, बॅ. नाथ पै सेवांगणाचे व्यवस्थापक श्री. बाळ मालवणकर, श्री. ना. वि. आकेरकर तसेच श्री. अ. ना. कांबळी यांचे बहुमोल सहकार्य लाभत आहे. या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. संस्थेचे लेखापरिक्षक श्री. के. एल्. फाटक यांनी संस्थेचे लेखापरीक्षण करून दिले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

*आपले विनीत*

| | |
|---|---|
| **रमेश धुरी** | **रमेश कुबल** |
| अध्यक्ष | कार्यवाह |

## ☼ श्री. रमेश धुरी यांचा सन्मान ☼

आंतरराष्ट्रीय संस्थे तर्फे दिला जाणारा 'ग्रीन पीस' पुरस्कार 'रेनबो वॉरियर' या बोटीवर चेन्नाई येथे १० जानेवारी २००० रोजी प्रदान करण्यात आला या समारंभाला थॉमस कोचरी हरेकृष्ण डेबनाथ ऑस्ट्रेलियाचे माईकहेगलर हॉलंड, डेन्मार्क, इंग्लंड आणि जपानचे प्रतिनिधी उपस्थिती होते.
संघाच्या वतीने अभिनंदन.

**मालवण तालुका श्रमिक मच्छिमार संघ, मालवण**
**जमाखर्च पत्रक १९९९ - २०००**

| जमा | रक्कम | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | १८५—६० | छपाई | १५०९—८० |
| सारस्वत बँक (१४२२) | ८२०५—२० | टेलिफोन | ३७०—२० |
| वर्गणी | ९४०—०० | प्रवास | ४०४४—५० |
| देणगी | १७४०—०० | बँक कमिशन | १५—०० |
| व्याज | १३३३—५० | लेखनिक मानधन | २००—०० |
| | | हिशोब तपासणीस फी | १०५०—०० |
| | | न्यास नोंदणी फी | ५२५—०० |
| | | एन्.एफ्.एफ् वर्गणी | १००—०० |
| | | तामिळनाडू फिशरमेन देणगी | १००—०० |
| | | चौकडीचे फलक | ४००—०० |
| | | शैक्षणिक उपक्रम | १६७९—०० |
| | | ओरीसा पुरग्रस्त मदत | ५००—०० |
| | | उसनवट परत | १०००—०० |
| | | टपाल | ३७६—५० |
| | | शिल्लक हाती | ०—६० |
| | | बँक (१४२२) | ५३३—७० |
| | १२४०४—३० | | १२४०४—३० |

वरील जमाखर्चपत्रक माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे

लेखापरीक्षक — के. एल्. फाटक (कुडाळ)

दि. १९/६/२०००

# वार्षिक सर्वसाधारण सभेचे निमंत्रण

(फक्त सभासदांसाठी)

मालवण तालुका श्रमिक मच्छिमार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ५/८/२००० रोजी सकाळी १०—३० वाजता बॅ. नाथ पै सेवांगण, धुरीवाडा — मालवण येथे आयोजित केली आहे. या सभेस आपण अगत्य उपस्थित राहावे अशी नम्र विनंती आहे.

## सभेपुढील कामे

१) मगील वार्षिक सभेचे इतिवृत कायम करणे.

२) १९९९—२००० च्या वार्षिक अहवाल आणि जमाखर्च पत्र.कास मंजूरी देणे.

३) २०००—२००१ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

४) सभासदांकडून आलेल्या ठरावावर विचार करणे.

५) अध्यक्षांच्या अनुमतीने येणाऱ्या कामाचा विचार करणे.

आपले नम्र

| | | |
|---|---|---|
| दि. | रमेश धुरी | रमेश कुबल |
| १८/७/२००० | अध्यक्ष | कार्यवाह |

### * विशेष सुचना *

१) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकुब राहिल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल. या सभेला गणसंख्येची अट राहाणार नाही.

२) सभासदांनी आपले ठराव, सुचना, प्रश्न कार्यालयात दि. ३/८/२००० पर्यंत पोच करावेत.

---

बुक — पोस्ट

प्रती, ______________________

______________________

______________________

---

प्रेषक — मालवण ता. श्रमिक मच्छिमार संघ, मालवण